२ || प्रभात पुणे, शनिवार, दि. २२ जुलै २०२३

# शंकरराव उरसळ महाविद्यालयास पुरस्कार

## प्लॅस्टिक संकलन अभियानाची दखल

प्रभात वृत्तसेवा



**पुणे :** पुरस्काराचा स्वीकार करताना शंकरराव उरसळ महाविद्यालयाचे मान्यवर.

**पुणे, दि. २१** - खराडी येथील पुणे जिल्हा शिक्षण मंडळ संस्थेचे शंकरराव उरसळ कॉलेज ऑफ फॉर्मास्युटिकल सायन्सेस अँड रिसर्च सेंटर महाविद्यालयास 'प्लॅस्टिक संकलन आणि प्लॅस्टिक पुनर्वापर महाविद्यालय' व 'उत्कृष्ट स्वच्छ महाविद्यालय' पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे अध्यक्ष आणि महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त सुरू करण्यात आलेल्या प्लॅस्टिक संकलन अभियानास एक वर्ष पूर्ण होत आहे. या निमित्ताने सुभद्रा माऊली या संस्थेने महाविद्यालयास पुरस्काराने सन्मानित केले. सुभद्रा माऊली प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रवीण मोरे म्हणाले की, महाविद्यालयाने सुरू केलेले प्लॅस्टिक मुक्त अभियान आणि प्लॅस्टिक संकलन हे उपक्रम अतिशय कौतुकास्पद आहे. संपूर्ण संकलित प्लॅस्टिक एकत्र करून संस्थेच्या माध्यमातून सागर मित्र प्लॅस्टिक कलेक्शन सेंटरकडे विविध वस्तू बनवण्यास दिले जाते, असे प्राचार्य डॉ. अशोक भोसले यांनी सांगितले. उपप्राचार्या डॉ. विजया बर्गे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी प्राचार्य डॉ. सचिन कोतवाल, डॉ. सुजित काकडेसह आदी उपस्थित होते. प्लॅस्टिक संकलन अभियान समन्वयक प्रा. तेजस्विनी कांदे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. प्रशांत खाडे यांनी आभार मानले.